7 DEC 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सध्याच्या काळात कौशल्यपूर्ण शिक्षणाची आवश्यकता

वार्ताहर
कोलोली

नावीण्यपूर्ण उपक्रमाला तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी कौशल्यपूर्ण शिक्षणाची आवश्यक्ता आहा। असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

माळवाडी/कोतोली (ता. पहाळा) येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालयात शिक्षण संस्थेच्या २२ व्या वर्धापन दिन कार्लक्रम प्रसंगी डॉ.नांदवडेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक व जि. प. चे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती डॉ. के. एस. चौगुले होते. परदेशात प्रयोगांना बळ देवून वेगवेगळया उपक्रमाची निर्मिती केली जाते. त्याचाही आदर्श आपण घ्यावा कॅशलेश, स्टार्टअप इंडिया सारख्या योजनेतून तरुण वर्ग काहीतरी करु शकतो. आवडणाऱ्या कामाची निवड करुन त्यामध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

**कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे प्रतिपादन**

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळा येत्या १५ दिवसात डिजीटल करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जि. प. चे शिक्षण व अर्थ समिती सभापती अंबरीश घाटगे यांनी केले. पालकांच्या आपेक्षा पूर्ण करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे., असे घाटगे यांनी सांगितले.

अशा डोंगराळ व दुर्गम भागात मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय करुण विद्यार्थ्यांची शिक्षणातील वाढती संख्या बघून मुलींच्या उच्च शिक्षणाचा उद्देश सफल झाला आहे. असे प्रतिपादन संस्थापक डॉ. के. एस. चौगुले यांनी केले.

कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष जी. टी. पाटील, खजानीस एम. एस. चौगुले, संस्थेच्या सदस्या, जि.प. सदस्या व जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्या सौ. कल्पनाताई केरबा चौगुले, माजी प्राचार्य डॉ. जे. के. पवार, प्रभारी प्राचार्य ए. आर. महाजन, प्रवीण आंबेरकर, डॉ. सर्जेराव पाटील, दगडू पाटील घोडवडेकर, सूर्यकांत दिंडे, संस्थेचे सचिव शिवाजी पाटील, प्रा. दिग्वीजय पवार, प्रा. डॉ. अजय चौगुले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. अजय चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डी. बी. इनामदार यांनी केले. आभार प्रवीण आंबेरकर यांनी मानले.



माळवाडी / कोतोली : श्रीपतराव चौगुले महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत प्राचार्य डॉ. जे के. पवार, शिवाजी पाटील, प्र. प्राचार्य ए. आर. महाजन, अंबरीश घाटगे, डॉ. के. एस. चौगुले, सौ. कल्पना चौगुले, प्रा. सौ. उषा पवार, आदी.

7 DEC 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठात वाढणार 'वाय-फाय'ची गती

## विद्यार्थ्यांना मिळणार निःशुल्क सेवा

**राजेश मोरे :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : मोबाईल असूनही संशोधनासाठी अगर अभ्यासाच्या पूरक साहित्यासाठी इंटरनेट सुविधा सामान्य विद्यार्थ्यांना परवडत नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाकडून पर्यायी गतिमान वाय-फाय सेवा निःशुल्क उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही सेवा लवकरच कार्यान्वित केली जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठात ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात. आजच्या युगात इंटरनेटला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जवळपास प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन असून, त्याआधारे या सुविधेचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांना अनेक संदर्भासाठी, अभ्यासाचे पूरक साहित्य जमा करण्यासाठी, संशोधनासाठी ही इंटरनेट सुविधा उपयुक्त ठरतेय. विद्यापीठात शिकणारे अनेक विद्यार्थी 'कमवा व शिका' या माध्यमातून शिक्षण घेतात. अशा विद्यार्थ्यांना मोबाईल असूनही इंटरनेट सुविधा घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीत. शिवाजी विद्यापीठात सध्या वाय-फाय सुविधा उपलब्ध आहे; पण त्याच्या गतीवर मर्यादा येत आहेत. त्यामुळे त्याचा सक्षमपणे विद्यार्थ्यांना, शिक्षकांना वापर करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. शिवाजी



**"पर्यायी वाय-फाय सेवा विद्यार्थ्यांना निःशुल्क उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. अभ्यास, संशोधनासाठी लागणारे पूरक साहित्य विद्यार्थ्यांना वेळेत उपलब्ध व्हावे, हा यामागील विद्यापीठाचा उद्देश आहे.**
**- डॉ. विलास नांदवडेकर,** कुलसचिव

विद्यापीठाशी एका मोबाईल कंपनीने संपर्क साधून निःशुल्क वाय-फाय सुविधा देण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास अधिकार मंडळाने मान्यता दिल्यानंतर त्या कंपनीशी विद्यापीठाने करार केला. या माध्यमातून विद्यापीठाला स्वतंत्र 'ॲक्सेस' मिळणार आहे. त्याआधारे विद्यापीठातील मुख्य इमारतीसह सर्व विभाग त्याला जोडण्यात येत आहेत. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही गतिमान निःशुल्क वाय-फाय सुविधा लवकरच सुरू केली जाणार आहे.

पान २ वर »

## विद्यापीठात वाढणार 'वाय-फाय'ची गती

» पान १ वरून

त्या माध्यमातून विद्यापीठात पदवी, पदवीत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे. शिक्षणामध्ये संशोधन अभ्यासासाठी पूरक साहित्य, पुस्तके, शब्दकोषसह विविध प्रकारच्या अभ्यासासाठी उपयुक्त गोष्टी वाय-फाय सुविधेच्या माध्यमातून इंटरनेटवरून मिळवता येणार आहेत.

या सुविधेचा लाभ विद्यापीठातील शिक्षकांसह भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला घेता येणार आहे. उपलब्ध होणाऱ्या या वायफाय सेवेबद्दल विद्यार्थ्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2017
तरुण भारत

# व्यवस्थापन परिषदेकडे विद्यापीठ परिक्षेत्राचे लक्ष

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी निवडणूक झाली. आता व्यवस्थापन परिषदेवर आपलीच वर्णी लागावी यासाठी आघाडी प्रमुखांकडे फिल्डींग लावली जात आहे. तसेच राज्यपाल, कुलगुरू नियुक्त सदस्यांची यादी प्राप्त झाल्यानंतर पुढील आठवड्यात व्यवस्थापन परिषदेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठ निवडणूकीत विद्यापीठ विकास आघडीकडे सिनेटचे बहुमत असून, अभ्यासमंडळावरही आघाडीचे वर्चस्व आहे. बिद्यापरिषदेच्या सर्वच जागा सुटाने जिंकल्या असून, सिनेटमध्ये महाविद्यालयीन शिक्षक गटातील आठ जागा सुटाकडे आहेत. आघाडीकडे जास्त जागा असल्याने व्यवस्थापन परिषदेवर त्यांचे वर्चस्व राहील हे स्पष्ट आहे. यासाठी सर्व संघटना प्रमुखांच्या गाठीभेटी घेण्यात प्राचार्य, शिक्षक व्यस्त आहेत. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यापीठ विकास करण्यासाठी सर्वच संघटनांना न्याय देण्याचा निर्णय संघटनांच्या नेत्यांनी घेतला आहे.

### व्यवस्थापन परिषदेतील जागा

राज्यपाल नियुक्त–दोन, विभागप्रमुख–दोन, डीन–एक, कुलगुरूनियुक्त–एक, प्राचार्य– दोन, प्राध्यापक–दोन, संस्था प्रतिनिधी–दोन, पदवीधर–दोन, विद्यापरिषद–दोन आदी गटानुसार प्रतिनिधीत्व असेल. या सर्व जागांसाठी मतदान होणार आहे.



पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र कार्यान्वित झालेले असल्यामुळे कोल्हापूरचे नाव जगाच्या नकाशावर आले आहे. या केंद्रामुळे कोल्हापूर आणि परिसरातील विद्यार्थ्यांना आणि खगोलप्रेमींना अवकाशविषयक अनेक माहिती उपलब्ध होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून हे केंद्र सुरु होण्यामध्ये लालफितीचा अडथळा होता. मात्र, आता हा अडथळा दूर झाला असून विद्यार्थ्यांना अवकाश संशोधनासंदर्भातील अनेक विषयांचा अभ्यास करता येणार आहे. या विषयाशी संबंधित अभ्यासक्रमही सुरु झाल्याने इस्रो, आयुका यासारख्या संस्थांमधील संधी उपलब्ध झाली आहे.



## शिवाजी विद्यापीठाचे संशोधन केंद्र : पावणेदोन वर्षापासून रिसीव्हर कार्यान्वित

# अवकाश केंद्र 'इस्रो'च्या नकाशावर

संतोष मिठारी

पन्हाळगडावर शिवाजी विद्यापीठाने साकारलेल्या अवकाश संशोधन केंद्रात भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) इंडियन रिजनल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (आय.आर.एन.एस.एस.) या उपग्रह कार्यक्रमांतर्गत एक रिसीव्हर बसविला आहे. त्याच्यामार्फत गेल्या पावणेदोन वर्षांपासून उत्तम पद्धतीने संदेश (सिग्नल) ग्रहण केले जात आहेत. या रिसीव्हरमुळे विद्यापीठाच्या अवकाश केंद्राची 'इस्रो'च्या नकाशावर ओळख निर्माण झाली आहे.

'इस्रो'मधून निवृत्त झालेले प्रा. आर. व्ही. भोसले यांनी उल्कावर्षाव, खगोलशास्त्र, सौरडाग, वातावरणशास्त्र, आर्दीबाबतचे संशोधन, अभ्यासासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे पन्हाळगडावर अद्ययावत अवकाश संशोधन केंद्र स्थापन करण्याची संकल्पना तत्कालीन कुलगुरु डॉ. के. बी. पवार यांच्यासमोर मांडली. यानंतर सन १९९३ मध्ये डॉ. पवार यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी ए. आर. जैन यांच्याकडे पन्हाळगडावरील दोन एकर जागेची मागणी करणारा प्रस्ताव सादर केला. त्यावर त्यांनी पन्हाळगडावरील पुसाटी बुरुजाशेजारी एक एकर जागेवर आरक्षण नोंदविले. यानंतर पुढील प्रशासकीय कार्यवाही होऊन १९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या केंद्राला मूर्त स्वरुप आले. अवकाश निरीक्षणासह या क्षेत्राशी निगडित विविध प्रकारचे संशोधन या केंद्रातून करण्याचे विद्यापीठाने ठरविले आहे. त्यानुसार या केंद्रामध्ये 'इस्रो'च्या आय.आर.एन.एस.एस. या उपग्रह कार्यक्रमांतर्गत एक रिसीव्हर दि. ४ मार्च २०१६ रोजी बसविण्यात आला.

'इस्रो'च्या आय.आर.एन.एस.एस. या उपग्रह कार्यक्रमांतर्गत सात उपग्रह अवकाशात सोडले जाणार आहेत. त्यांपैकी पाच उपग्रह प्रक्षेपित आहेत. या सात उपग्रहांच्या साहाय्याने आपला देश आता स्वतःची स्वतंत्र नेव्हिगेशन प्रणाली तयार करीत आहे. उपग्रहांकडून येणारे संदेश ग्रहण करण्यासाठी देशभरात सुमारे १०५ रिसीव्हर बसविण्यात येत आहेत. त्यांपैकी २३ व्या क्रमांकाचा रिसीव्हर शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रामध्ये बसविण्यात आला आहे.

आय.आर.एन.एस.एस. मालिकेमधील आतापर्यंत प्रक्षेपित करण्यात आलेल्या पाचही (१-ए ते १-ई) उपग्रहांकडून येणाऱ्या संदेशांची पातळी या रिसीव्हरमध्ये उत्तमरीत्या नोंदविली जात आहे. या रिसीव्हरमुळे विद्यापीठाच्या अवकाश केंद्राने 'इस्रो'च्या माध्यमातून भारतीय अवकाश कार्यक्रमाच्या नकाशावर स्थान मिळविले आहे.

नितीन भगवान, पन्हाळा



शिवाजी विद्यापीठामार्फत साकारलेले पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राची इमारत. याच ठिकाणाहून या केंद्राचे काम चालणार आहे.

"'इस्रो'चा रिसीव्हर बसविल्याने या विद्यापीठाच्या केंद्राची भारतीय अवकाश कार्यक्रमात एक नवी ओळख निर्माण झाली आहे. यापुढे जाऊन अवकाश संशोधन करण्यासाठी 'इस्रो'ची मदत, मार्गदर्शनानुसार उपक्रम राबविण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. शाळा ते महाविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्यांना हे केंद्र कसे उपयुक्त ठरेल, या दृष्टीने आमचे प्रयत्न राहणार आहेत.

- डॉ. डी. टी. शिर्के,
प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

"'इस्रो'चा रिसीव्हर, रिव्ह्यू मीटर, वेदर स्टेशन, आर्दीच्या माध्यमातून संदेश आणि निरीक्षणे नोंदविण्याचे काम या केंद्रात सुरु आहे. यातून मिळणाऱ्या माहितीचे विविध पद्धतींनी संशोधन, विश्लेषण करून त्यांना अधिक चांगल्या पद्धतीने अभ्यास करण्याची सुविधा संशोधक, विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे.

- डॉ. ए. के. शर्मा,
समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र,
शिवाजी विद्यापीठ

7 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**पी. एस. कांबळे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान**

# आंबेडकरांची विकास नीती धोरणात हवी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजकीय, आर्थिक, सामाजिक समतोल साधण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे. जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरण या आधुनिक धोरणांमुळे शहरी व ग्रामीण यांच्यातील समतोल बिघडत चालला आहे. शिक्षणाच्या खासगीकरणातून सामाजिक वंचितता वाढत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अशी कमालीची विषमतेची दरी असलेला विकास अपेक्षित नव्हता. त्यामुळेच डॉ. आंबेडकर यांची विकास नीती सरकारच्या धोरणात समाविष्ट झाली पाहिजे, असे प्रतिपादन अर्थशास्त्रज्ञ डॉ. पी. एस. कांबळे यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रामध्ये महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विकास नीतीबाबत विचार व सद्य:स्थिती' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानात अर्थशास्त्रज्ञ डॉ. पी. एस. कांबळे यांनी विचार मांडले

अर्थशास्त्रज्ञ डॉ. कांबळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. स्वतंत्र भारताच्या विकासाचे धोरण कसे असावे त्याची व्याप्ती व रचना यांची मांडणी त्यांनी भारत स्वतंत्र होण्यापूर्वीच करून ठेवली. भारताच्या विकासाचे शेती व उद्योग हे महत्त्वाचे भागीदार असून त्यांची मालकी सरकारकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे गरजेचे आहे. शिक्षणासाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली आहे.

या कार्यक्रमास डॉ. जे. एफ. पाटील, राजेंद्र सोनकवडे, प्रतिभा पाटणकर, एस. एस. कांबळे, जी. बी. अंबपकर, अविनाश भाले उपस्थित होते. यावेळी तेजश्री सावंत यांनी प्रास्ताविक केले. मेघाताई कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धोरणांची अंमलबजावणी गरजेची : महाजन

संपूर्ण भारताच्या विकासाच्या नियोजनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा समावेश झाला पाहिजे. त्यांनी विकासासाठी जी धोरणे मांडलेली आहेत, ती आजही तितकीच उपयुक्त असून त्यांची अंमलबजावणी होण्याची गरज आहे, असे मत डॉ. महाजन यांनी व्यक्त केले.